# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२६

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### मुंबईतील म्हाडा वसाहतींच्या भाडेपट्टा नुतनीकरणाच्या धोरणाबाबत

**(१) २८१ (१७-०४-२०२५) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शहरी भागात काम करणाऱ्या चाकरमान्यांना राहण्याकरीता भाड्याच्या घरांची वाढती मागणी लक्षात घेऊन घरमालकासोबतच भाडेकरुचेही हित जपले जावे, भाडेकरुला कायदेशीर संरक्षण मिळावे यासाठी शासनाच्या निर्देशानुसार म्हाडाकडून परवडणाऱ्या भाड्याच्या घराचे धोरण ठरविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धोरणाचे थोडक्यात स्वरुप काय आहे, या धोरणाची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, मुंबईतील म्हाडा वसाहतीत राहणाऱ्या मध्यमवर्गीय नागरिकांना अधिकच्या भाडेपट्ट्यातून दिलासा देण्याकरीता धोरण निश्चित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२७-०५-२०२६) :** (१) व (२) महाराष्ट्र शासनाने राज्याचे गृहनिर्माण धोरण - २०२५ निश्चित केले असून त्यात “परवडणारी भाडे तत्वावरील घरे” महाराष्ट्रात उपलब्ध करुन देण्याचे धोरण निश्चित केले आहे.

यानुषंगाने राज्याच्या गृहनिर्माण धोरण-२०२५ शी सुसंगत स्पष्ट विस्तृत स्वरुपाचे धोरण तयार करण्याची कार्यवाही म्हाडा स्तरावर सुरु आहे.

(३) प्राधिकरणाच्या ठराव क्रमांक ६१२९, दिनांक २४ ऑगस्ट, २००५ नुसार भाडेपट्टा नूतनीकरण करण्यात येत होते. भाडेपट्टा करारनामा संपुष्टात आल्यानंतर भाडेपट्टयाचे हस्तांतरण, वापरातील बदल व अटीशर्तीच्या अनियमिततेबाबत नियमन करण्यासाठी म्हाडा स्तरावर दिनांक १८ जून, २०१९ अन्वये ६ सदस्यिय समिती गठित करण्यात आली. सदर समितीच्या अहवालानुसार प्राधिकरणाने भाडेपट्टा करारनामा संपुष्टात आल्यानंतर तसेच भाडेपट्टयाचे हस्तांतरण, वापरातील बदल व अटीशर्तीच्या अनियमिततेबाबतच्या कार्यवाहीस प्राधिकरणाचा ठराव क्रमांक ६९९५, दिनांक २६ ऑगस्ट, २०२१ नुसार

मान्यता दिलेली आहे. तसेच हस्तांतरण व अनियमितता असलेल्या एकूण १३ प्रकरणात आकारावयाचे शुल्क जास्तीचे असल्यामुळे सदरचे शुल्क कमी करण्याबाबत निवेदने प्राप्त झालेली होती. त्याअनुषंगाने प्राधिकरणाचा ठराव क्रमांक ७०९४, दिनांक २९ फेब्रुवारी, २०२४ अन्वये सहा महिन्यापर्यंत अभय योजना लागू केली होती. सदर अभय योजनेस मिळालेला प्रतिसाद पहाता प्राधिकरणाच्या ठराव क्रमांक ७१११, दिनांक ०८ ऑगस्ट, २०२४ अन्वये सदर अभय योजनेस दिनांक २८ ऑगस्ट, २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उध्दभवत नाही.

---

## नवी मुंबई येथे महाराष्ट्र भवनाची उभारणी करण्याबाबत

**(२) ७७७ (१७-०४-२०२५) श्री.विक्रम काळे, श्री.सत्यजीत तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण सरनाईक, श्री.जयंत आसगावकर : दिनांक १८ डिसेंबर, २०२४ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ११ मधील प्रश्न क्रमांक २३५९४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई येथे महाराष्ट्र भवन बांधण्याचा निर्णय शासनाने घेतला असून नगरविकास विभागासमवेत दिनांक ०४/०७/२०२४ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार दिनांक १ जून २०२३ रोजी झालेल्या बैठकी दरम्यान मा.मुख्यमंत्री महोदयांनी सदर काम सिडको मार्फत हाती घेण्यात यावे असे निर्देश दिलेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार सिडकोने कोणती कार्यवाही केली आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२७-०४-२०२६) :** (१) व (२) वाशी, नवी मुंबई येथील सेक्टर-३०ए, मध्ये भूखंड क्र. १२ आणि १३, क्षेत्रफळ ३९९९.३८ चौ.मी. वर महाराष्ट्र भवनाचे बांधकाम सुरु असून सदरचे काम ७३० दिवसांमध्ये (२४ महिने) पूर्ण करण्याचे नियोजित आहे. सदर बांधकामाच्या अनुषंगाने आवश्यक असणारी पर्यावरण मंजुरी दिनांक २४/०९/२०२५ रोजी प्राप्त झाली असून बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र दिनांक १५/१०/२०२५ रोजी प्राप्त झाले व महाराष्ट्र प्रदूषण महामंडळाची परवानगी दिनांक २९/१२/२०२५ रोजी प्राप्त झाली आहे. सदर कामाचा कार्यादेश कंत्राटदारास दिनांक १५/१०/२०२५ रोजी देण्यात आला आहे.

सद्य:स्थितीत तळ मजल्याखालील ३ मजल्यांचे उत्खननाचे काम सुरु असून सभोवतालच्या इमारतीस व रस्त्यास कोणताही धोका होऊ नये याकरीता शेअर पायलिंगचे काम प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत खासगी विकासकाच्या माध्यमातून पुर्नविकास प्रकल्प राबविण्यात येत असल्याबाबत

**(३) १०५६ (१७-०४-२०२५) ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत झोपडपट्टीवासीयांना हक्काचे पक्के घर मिळावे म्हणून शासनाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत खाजगी विकासकांच्या माध्यमातून पुनर्विकास प्रकल्प राबविण्यात येत असून गत ३ वर्षात ३२० योजनांपैकी १०१ योजना कार्यान्वित झाल्या असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उर्वरित २१९ योजनांपैकी १६६ योजना ह्या विकासकाकडे निधी उपलब्ध होत नसल्यामुळे प्रलंबित असून सदर १६६ पुनर्वसन योजना राबविण्याबाबत निधी उपलब्ध करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे तसेच सदर खाजगी विकासकांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (११-०६-२०२६) :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाअंतर्गत केवळ स्विकृत झालेल्या व पुढे कोणतीही प्रगती झालेली नसल्यामुळे दप्तरी दाखल केलेल्या ५१७ झोपु योजना व विविध कारणांमुळे रखडलेल्या ३२० योजना होत्या. तथापि, मागील ३ वर्षात शासनाच्या व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या प्रयत्नांमुळे ५१७ योजनांपैकी ३०६ योजनांमध्ये महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा निर्मूलन व पुनर्विकास) मधील कलम १३/२ अंतर्गत निर्णय घेण्यात आला असून त्यानूसार योजनेसंबंधी पुढील परवानग्या जारी करण्यात येत आहेत.

तसेच, विविध कारणांमुळे रखडलेल्या ३२० योजनांपैकी सद्यास्थितीत १२७ योजना रखडलेल्या असून उर्वरित योजनांबाबत कार्यवाही सुरु आहे.

शासनाच्या दिनांक २५ मे, २०२२ रोजीच्या शासन निर्णयानूसार रखडलेल्या झोपु योजना मार्गी लावण्याकरीता पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहे.
१) निविदा प्रक्रियेने विकासकाची नियुक्ती करणे.
२) अभय योजना राबविणे
३) मुंबई महानगर प्रदेशातील झोपडपट्टी पुनर्वसन योजना अन्य महामंडळे प्राधिकरणे/स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यामार्फत संयुक्त भागीदारी अन्वये राबविणे.
४) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई अंतर्गत झोपडपट्टी समूह पुनर्विकास योजना (Slum Cluster Redevelopment Scheme) राबविणे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यात शक्तिपीठ महामार्गाला विरोध करण्यात येत असल्याबाबत

**(४) १२३२ (१७-०४-२०२५) श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर ते गोवा शक्तिपीठ महामार्गाची थांबविण्यात आलेली भूसंपादन प्रक्रिया येत्या काही दिवसात पुन्हा सुरू होत असताना या भूसंपादनातून कोल्हापूर जिल्हा वगळून भूसंपादन करण्यात येणार असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे

काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने समृद्धी महामार्गाच्या धर्तीवर नागपूर ते गोवा शक्तीपीठ महामार्गाचा प्रकल्प हाती घेत सध्या अस्तित्वात असलेले राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गालगत किंवा रस्त्यांचे रुंदीकरण केल्यास या जुन्या रस्त्यांचा वापर होऊन शासनाच्या खर्चात मोठ्या प्रमाणात बचत होत असून हजारो हेक्टर पिकणारी जमीन या प्रकल्पास दिल्यास बागायती क्षेत्र कमी होऊन अन्नधान्याचे उत्पादन कमी होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यात शक्तिपीठ महामार्गाला विरोध असतानाही सदर प्रकल्प राबविण्याचा शासनाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने राज्यातील दळणवळण आणि वास्तविक संबंधित वाढ करण्यासाठी तसेच पर्यटनाला व्यापक प्रमाणात गती देण्याकरता सदर कामाचे नियोजन करून बाधित शेतकऱ्यांना नवीन नियमाप्रमाणे किती रक्कम देण्यात येणार आहे याबाबतचा कृती आराखडा शासनाकडे उपलब्ध आहे काय, असल्यास त्याचे स्वरूप काय आहे,
(४) असल्यास, शक्तीपीठ महामार्गाच्या कामाचे नियोजन करताना तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निदेशानुसार या शक्तिपीठ महामार्गाच्या संपूर्ण प्रकल्पाचे सादरीकरण बाधितांना आणि सर्वसामान्यांना दाखविण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास,शक्तीपीठ महामार्गाची अधिसूचना काढताना या प्रकल्पात बाधित शेतकऱ्यांना प्रकल्प दाखला, नवीन बाजार मुल्याच्या सहापट मोबदला आणि या रस्त्याला भविष्यात टोल आकारल्यास त्या टोल मध्ये कायमस्वरूपी शेतकऱ्यांना भागीदारी देऊन किमान मोबदला देण्यात द्यावा व प्रत्येक प्रकल्पग्रस्ताच्या कुटुंबातील एका सदस्यास शासकीय नोकरी व इतर सर्व शासकीय योजनांचे लाभ तसेच प्रकल्पग्रस्ताचा दाखला आदी सुविधांचा अंतर्भाव त्या अधिसूचनेत करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (११-०५-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग प्रवेश नियंत्रित द्रुतगती मार्ग असून तो पवनार, जि.वर्धा येथे सुरु होऊन पत्रादेवी, जि.सिंधुदूर्ग गोवा हद्दीपर्यंत आहे. सदर महामार्गामुळे नागपूर ते गोवा हा सद्य:स्थितीमधील १८ तासांचा प्रवास साधारणत: ८ तासांवर येणे अपेक्षित आहे. तसेच या महामार्गाची आखणी करताना कमीत कमी बागायती जमीनी संपादन करण्याचा व वन्य जीव याबाबत नियमांनुसार आवश्यक त्या सर्व परवानग्या घेण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(३) महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ सुधारणा २०१८ चे शासन अधिसूचनेनुसार कलम १९(ब) मध्ये नवीन भूसंपादन अधिनियम, २०१३ चे कलम, २६ ते ३० व परिशिष्ट-१ अन्वये बाधित शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मोबदला अनुज्ञेय आहे.

तसेच जे भूधारक संपादनास संमती देतील त्यांना दिनांक २९/०५/२०१८ च्या शासन निर्णयानुसार एकूण देय मोबदला रकमेवर अतिरीक्त २५ टक्के रक्कम अनुज्ञेय राहील.
(४) याबाबत लिखीत स्वरुपात निर्देश अप्राप्त असून संबंधित यंत्रणामार्फत बाधित क्षेत्रानुसार आखणी बाबत गावपातळीवर बैठकांमध्ये माहिती देण्यात येत आहे.

(५) शेतकऱ्यांच्या निवेदनांबाबत सर्वंकष विचार करुन तसेच प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घेऊन शेतकरी / भूधारक यांना विश्वासात घेण्यात येत आहे व सदर प्रकल्पाच्या भूसंपादन प्रकरणी शेतकऱ्यांचे / भूधारकांचे नुकसान होणार नाही, यादृष्टीने शासनामार्फत नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सांगली जिल्ह्यातील सेतू भारतम योजनेतील रेल्वे उड्डाणपुलाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(५) १३६२ (१४-०४-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जुना बुधगाव (जि.सांगली) रस्त्यावरील सेतू भारतम योजनेतील रेल्वे उड्डाणपुलाचे बांधकाम प्रलंबित असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रेल्वे फाटकाच्या दोन्ही बाजूकडील अतिक्रमणे हटविण्यात आली असून काही मालमत्ता धारकांनी जागेच्या मालकीबाबत प्रश्न उपस्थित केल्याने संभ्रम निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास या रेल्वे फाटकाच्या दोन्ही बाजूकडील अतिक्रमणे हटविण्यातबाबत तसेच जागेच्या मालकीबाबत कारवाई करण्याच्यादृष्टीने शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१९-०६-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर रस्ता व रेल्वे उड्डाणपुलाचे काम हे सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका हद्दीत येत असून सदरचे काम MRIDC मार्फत सुरु आहे. सद्य:स्थितीत MRIDC यांचे कडून सांगली जिल्ह्यातील जुना बुधगांव रोडवरील लेव्हल क्रॉसींग क्रमांक १२९ येथे मध्य रेल्वे ओव्हर ब्रीज (ROB) चे बांधकाम प्रगती पथावर आहे.
(२) हे खरे नाही. MRIDC यांनी कळविलेनुसार रेल्वे फाटकाच्या दोन्ही बाजूवरील अतिक्रमण हटविण्याशी संबंधित कोणतीही विशिष्ट बाब प्रकल्पाच्या कामकाजावर परिणाम करणारी आढळून आलेली नाही.
(३) MRIDC यांनी सादर केल्यानुसार सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेने प्रकल्प स्थळी असलेले सर्व अतिक्रमणे हटविण्याची कार्यवाही पूर्ण केली आहे.
(४) सदरचे काम नियोजित गतीने पूर्ण करण्यासाठी MRIDC प्रयत्नशील आहे.

---

## राज्यातील शिवभोजन केंद्राचे प्रलंबित अनुदान वितरित करण्याबाबत

**(६) १३७४ (२४-०४-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक २२२२६ ला दिनांक १४ डिसेंबर, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील भोजन केंद्राचे अनुदान वेळेवर वितरित होत नसल्याने केंद्र चालकांची देयके प्रलंबित राहत असल्याने शिवभोजन केंद्रधारकांना मोठ्या आर्थिक समस्याचा सामना करावा लागत असल्याचे माहे जानेवारी,२०२५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अनुदानात सुसूत्रता आणण्यासाठी व शिवभोजन केंद्राच्या ईष्टांकामध्ये शासनाने वाढ केली आहे काय,असल्यास त्याचे स्वरूप काय आहे,
(३) तसेच, शिवभोजन केंद्रामध्ये भोजनासाठी सध्याची वेळ ११ ते ३ आहे त्यात फक्त दुपारचे जेवण दिले जाते परंतु संध्याकाळचे भोजन देण्याबाबत तसेच नवीन शिवभोजन केंद्रांना मंजुरी देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचारधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शिवभोजन केंद्रामध्ये संध्याकाळचे भोजन सुरु करण्याबाबत व नवीन शिवभोजन केंद्राना मंजुरी देण्याबाबत तसेच शिवभोजन केंद्राचे अनुदान वेळेत वितरित करुन केंद्र चालकांची देयके वेळेत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (२९-०५-२०२६) :** (१) सन २०२४-२५ या वित्तीय वर्षात शिवभोजन योजनेंतर्गत २.०० लक्ष इष्टांकासाठी रुपये २६७.४८ कोटी इतकी तरतूद मंजूर करण्यात आली आहे. त्यापैकी दिनांक ३१/०३/२०२५ अखेर सर्व क्षेत्रिय कार्यालयांना एकूण रुपये २११.७० कोटी इतकी रक्कम शासनाकडून वितरीत करण्यात आली आहे.
(२) शिवभोजन केंद्रचालकांची देयके अदा करण्याबाबत सुसूत्रता आणण्यासाठी शासन परिपत्रक, क्र. शिभोथा-१३२३ / प्र.क्र. ८५/ ना.पु.१७, दिनांक २७/११/२०२४ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

शिवभोजन केंद्राच्या इष्टांकामध्ये शासनाकडून कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही.
(३) व (४) शिवभोजन थाळी वाटपाची वेळ सकाळी ११ ते दुपारी ३ इतकी असून शिवभोजन थाळी वाटप सायंकाळी सुरू करणे, ही धोरणात्मक बाब असून सद्य:स्थितीत याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन नाही.

त्याचप्रमाणे सद्य:स्थितीत नवीन शिवभोजन केंद्राना मंजुरी देण्याचा कोणताही प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन नाही.

शिवभोजन केंद्रचालकांची देयके अदा करण्याबाबत सुसूत्रता आणण्यासाठी अनापुवि शासन परिपत्रक, क्र. शिभोथा-१३२३ / प्र.क्र. ८५/ ना.पु.१७, दिनांक २७/११/२०२४ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पोलादपूर येथील समाधी स्थळांच्या सुशोभिकरणाच्या कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(७) १९०६ (२४-०४-२०२५) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्माची अचूक वेळ सांगणारे कविंद्र परमानंद यांच्या पोलादपूर येथील

समाधी स्थळाच्या सुशोभीकरणाचे काम सन १९९७ नंतर करण्यात आलेले नसून याठिकाणी एका संस्थेमार्फत करण्यात येत असलेले दुर्ग सृष्टीच्या उभारणीचे कामही अपूर्णावस्थेत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू ठिकाणी दुर्ग सृष्टीच्या उभारणीचे काम अद्याप पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत व सदरहू काम पूर्ण करुन त्यानुषंगाने निधीची आवश्यकता असल्यास आवश्यक निधीची उपलब्धता करून देण्याबाबत तसेच या ठिकाणाचे सुशोभीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-०६-२०२६) :** (१) व (२) पोलादपूर नगरपंचायती मार्फत सन २०१८-१९ मध्ये स्वामी कवींद्र परमानंद मठाचे सुशोभिकरणाचे काम करण्यात आले. सदर कामात मठाचे प्लास्टर, दरवाजे खिडक्या, लादी, रंगकाम, पेव्हर ब्लॉक इ. कामे पूर्ण करण्यात आली असून ती सुस्थितीत आहेत. मठाच्या परिसरातील जागेत दुर्गसृष्टी उभारण्याचे काम सन २०१० मध्ये यंग ब्लड अडॅव्हेन्चर्स या संस्थेमार्फत लोकसहभागातून सुरु होते. परंतु काही अडचणी निर्माण झाल्यामुळे संस्थेने काम बंद ठेवले असून अपूर्ण अवस्थेत आहे.

सन २०२३-२४ मध्ये शासनाने कवींद्र स्वामी परमानंद मठ सुशोभीकरणासाठी रुपये २०.०० लक्ष निधी मंजूर केला आहे. सदर कामांतर्गत कुंपण भिंत बांधकाम, पेव्हर ब्लॉक, चेकर टाईल्स, गार्डन सुशोभीकरण, बेंचेस इ. कामे हाती घेण्यात आली असून कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करून कार्यादेश देण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## प्रस्तावित नाशिक वाढवण एक्सप्रेसमार्गाबाबत

**(८) २४५२ (१७-०७-२०२५) श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्रस्तावित नाशिक वाढवण एक्सप्रेस वेचे नियोजन हे नाशिक वाढवण रेल्वे मार्गासोबत करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ मार्च, २०२५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाची अतिरिक्त भांडवली गुंतवणूकीची बचत करण्यासाठी प्रस्तावित नाशिक वाढवण एक्सप्रेस वे रेल्वे मार्गासोबत जोडण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (११-०६-२०२६) :** (१) हे खरे आहे,
(२) वाढवण नाशिक द्रुतगती महामार्ग व नाशिक वाढवण रेल्वे मार्गाची बहुतांशी लांबी ही डोंगराळ भागातून जात असल्याने रेल्वे अभियांत्रिकी मानकानुसार १% उतार विहित केलेला असून व IRC मानकानुसार महामार्गासाठी २.५०% उतार विहित केलेला असणे, दोन्ही मार्गांसाठी सुरुवातीचा व शेवटचा बिंदू भिन्न असणे, रेल्वे व रस्त्याचे बोगदे एकत्र करणे शक्य नसणे, महामार्गाच्या इंटरचेंजमुळे रेल्वे मार्गास

होणारा अडथळा, संयुक्त आखणीमुळे अधिक जमीन व लांबीची आवश्यकता भासणे इत्यादी. अडचणींमुळे प्रस्तावित महामार्ग रेल्वे मार्गासोबत जोडणे तांत्रिक व अर्थिक दृष्टया सुसाध्य होत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणामध्ये पदभरती करण्याबाबत

**(९) २६६१ (१७-०७-२०२५) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणामध्ये (म्हाडा) रिक्त पदांचा प्रश्न गंभीर झाला असून तांत्रिक व अतांत्रिक विभागात २५ ते ३० टक्के पदे रिक्त असल्याचे माहे मार्च, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे येथे जनतेची कामे होण्यात विलंब होत असून उपलब्ध कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण येत असून यासंदर्भात शासनाने माहिती व निर्णय घेऊन येथील कामाची व्याप्ती व कामे प्रलंबित राहू नये यासाठी पदभरती करणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१७-०६-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) प्राधिकरणातील मंजूर पदांपैकी सरळसेवा कोट्यातून गट-अ व गट-ब ची पदभरती करावयाच्या पदांच्या अनुषंगाने बिंदूनामावली सूची सामान्य प्रशासन विभागाकडून प्रमाणित करून घेण्यात आल्या आहेत व त्याबाबत शासनाच्या दिनांक १०/०३/२०२६ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणास कळविण्यात आले आहे. त्याचप्रमाणे गट-क पदांच्या बिंदूनामावली, सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष), कोकण भवन या कार्यासनाकडून प्रमाणित करून घेण्यात आल्या आहेत. त्यानुसार पदभरतीचा प्रस्ताव म्हाडा प्राधिकरणाकडून शासन मान्यतेसाठी प्राप्त झाला आहे. त्यानुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जळगाव महानगरपालिकेंतर्गत बनावट जन्म-मृत्यू दाखल्याच्या नोंदणी प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१०) ३०५० (१७-०७-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव महानगरपालिकेत बनावट जन्म-मृत्यू दाखल्यांच्या नोंदणी प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याची बाब दिनांक ०६ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषीवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२९-०४-२०२६) :** (१) ते (३) कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार जळगाव यांचेकडिल जन्म-मृत्यू नोंदी बाबत प्राप्त झालेल्या आदेशांबाबत शंका निर्माण झाल्याने जळगाव मनपाच्या जन्म मृत्यू विभागामार्फत दिनांक २१/०३/२०२५ चे पत्राद्वारे ५० आदेशांची सत्यता पडताळणीबाबत कळविण्यात आले होते. त्यापैकी एकूण ४३ आदेश प्रकरणी कार्यकारी दंडाधिकारी तथा तहासिलदार जळगाव यांच्या स्वाक्षरी खोट्या व बनावट असल्याचे आढळून आल्याचे कळविलेले आहे. संबंधित प्रकरणी कार्यकारी दंडाधिकारी तथा तहासिलदार जळगाव यांचे कार्यालयामार्फत FIR NO.०१२९ दिनांक ०४/०४/२०२५ अन्वये संबधिताविरुध्द गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही केलेली आहे. सदर प्रकरणी पोलीस विभागामार्फत चौकशी सुरु आहे.

---

## राज्यातील अंत्योदय कार्डधारकांना साखर वाटप बंद करण्यात आल्याबाबत

**(११) ३९४५ (१८-०७-२०२५) डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनामार्फत केवळ अंत्योदय कार्ड धारकांना स्वस्त दरात साखर उपलब्ध करुन दिली जाते. परंतु गत वर्षापासून अंत्योदय लाभार्थ्यांना नियमित साखरेचे वितरण केले जात नसल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून याबाबत लाभार्थींमध्ये नाराजी असून शासनाने गरीब लाभार्थ्यांसाठी साखरेचे वाटप पुन्हा सुरु करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्व अंत्योदय योजनेच्या पात्र लाभार्थ्यांना सवलतीच्या दरात वितरित करावयाची प्रतिकुटुंब साखरचे वितरण पुन्हा सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे, वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (२९-०५-२०२६) :** (१) व (२) सन २०२५-२६ या वर्षामध्ये अंत्योदय अन्न योजनेतील लाभार्थ्यांना सवलतीच्या दराने साखर वाटप करण्यासाठीचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन होता.त्यानुषंगाने माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये साखर खरेदीची प्रक्रिया पूर्ण करुन अंत्योदय योजनेच्या पात्र लाभार्थ्यांना सवलतीच्या दरात माहे ऑक्टोबर, २०२५ पासून दरमहा प्रति कुटुंब १ किलो रुपये २०/- प्रति किलो याप्रमाणे साखर वाटप करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कल्याण -डोंबिवली महानगरपालिकेस सदनिका हस्तांतरित करुन न देता त्या सदनिकांची विकासकाने विक्री केल्याबाबत

**(१२) ५१९० (१४-१२-२०२५) ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण -डोंबिवली महानगरपालिकेला काही सदनिका हस्तांतरित करुन देणे बंधनकारक असताना त्या सदनिका विकासकाने परस्पर विक्री केल्याप्रकरणाची सखोल चौकशी पूर्ण झाली आहे काय,
(२) असल्यास,चौकशी अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाच्या नस्ती देखील गहाळ झाल्याचे निदर्शनास आले असून सदर प्रकरणी दोषी असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२२-०६-२०२६) :** (१) व (२) मौजे-कल्याण, सि.स.नं. ३४८० / २ ते १२ या भुखंडावरील बांधकाम परवानगी व्यतिरिक्त झालेले वाढीव बांधकामाच्या अनुषंगाने महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२ अन्वये विकासक विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
(३) मौजे-कल्याण, सि.स.नं. ३४८० / २ ते १२ या भुखंडावरील बांधकामाबाबतची नस्ती कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या नगररचना विभागातून गहाळ झाली होती. त्यामुळे महानगरपालिकेच्या इतर विभागाकडील सदर नस्तीमधील उपलब्ध बांधकाम नकाशे व परवानगीच्या आधारे दुय्यम नस्ती तयार करण्यात आली. सदर गहाळ नस्ती प्रकरणाबाबत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने प्राथमिक चौकशी केली. सदर चौकशीच्या आधारे श्री.कुणाल ससाणे, सर्व्हेअर, नगररचना, कडोंमपा यांना कारणे दाखवा नोटीस बजावली होती. संबंधिताचा खुलासा प्राप्त झाला असून तो प्रशासनाने अमान्य करुन त्यांची विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील मच्छीमारांचे अतिवृष्टीमुळे आर्थिक नुकसान झाल्याबाबत

**(१३) ५२३३ (१४-१२-२०२५) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गत दोन महिन्यापासून सातत्याने वादळवारे, खराब हवामान आणि अतिवृष्टीमुळे राज्यातील मच्छीमारांना सुमारे २५ ते ३० दिवस मासेमारी पूर्णपणे बंद ठेवावी लागल्यामुळे आर्थिक नुकसान झाल्याने शासनाने शेतकऱ्याप्रमाणे मच्छीमारांनाही तातडीने आर्थिक मदत करावी अशी मागणी मच्छीमार संस्थांनी केल्याचे माहे आक्टोबर, २०२५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू मच्छीमारांची मागणी पूर्ण करुन त्यांना आर्थिक मदत देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नितेश राणे (१५-०५-२०२६) :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.

माहे जून, २०२५ ते ऑगस्ट, २०२५ या कालावधीत खराब हवामान व अवकाळी पाऊस यामुळे मच्छिमारांना समुद्रात मासेमारीस जाता आलेले नाही. सदरच्या कालावधीत मासेमारीस न गेल्यामुळे मच्छिमारांचे झालेल्या नुकसानीबाबत अर्थसहाय्य म्हणुन नुकसान भरपाई मिळण्याबाबत ०८ मच्छिमार सहकारी संस्थांची निवेदने प्राप्त झालेली आहेत.

मच्छिमार सहकारी संस्थानी मागणी केल्यानुसार वादळवारे, खराब हवामान आणि अतिवृष्टीमुळे मच्छिमारांना मासेमारी बंद ठेवावी लागते. महसूल व वन विभाग शासन निर्णय दिनांक २७/०३/२०२३ मधील तरतूदीनुसार, नैसर्गिक आपत्तीमध्ये मच्छिमारांना झालेल्या नुकसान भरपाई देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे विहीगाव ते मलकापूर (ता.अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती) येथील पांदण रस्ता बांधून देणेबाबत

**(१४) ५७२० (१४-१२-२०२५) श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे विहीगाव ते मलकापूर (ता.अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती) येथील पांदण रस्ता बांधणेबाबत ग्रामपंचायतीकडून तहसिलदार अंजनगाव सुर्जी व बांधकाम विभागाकडे वारंवार अर्जाव्दारे मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुमारे २ किलोमीटरच्या या पांदण रस्त्याच्या दोन्ही बाजुला हजारो एकर कसदार शेती असून येथे पांदण रस्ता नसल्याने तेथील शेतमालाच्या पिकांच्या वाहतुकीकरीता अडथळा निर्माण होतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येथील शेतकऱ्यांची वाहतुकीची गैरसोय दूर करण्यासाठी महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत अथवा जिल्हानियोजन समितीअंतर्गत सदर पांदण रस्त्याचे बांधकाम करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (०७-०४-२०२६) :** (१) होय हे खरे आहे,

ग्रामपंचायत कार्यालय विहीगाव यांचेकडून मौजे विहीगाव है मलकापूर पांदण रस्ता बांधणेबाबत अर्ज गट विकास अधिकारी पंचायत समिती अंजनगाव सुर्जी यांच्या कार्यालयास प्राप्त झाल असून, गट विकास अधिकारी यांचे पत्र क. पंस.अंजन/मग्रारोहय ४९१७ - अ/२०२५, दिनांक २७/११/२०२५ नुसार उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक, मग्रारोहयो विभाग, जिल्हा परिषद, अमरावती यांन प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. सन २०२५-२६ च्य मातोश्री पांदण रस्ते आराखड्यात समावेश झालेला नाही.

(२) व (३) मा.मंत्रिमंडळाने दिनांक ७/१२/२०२५ रोजी झालेल्या बैठकीत "मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजना" ही स्वतंत्र योजना राबविण्यास मान्यता दिलेली आहे. याअनुषंगाने दिनांक १४/१२/२०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. तसेच दिनांक २३/०२/२०२६ च्या शासन निर्णयान्वये या योजनेसाठी स्वतंत्र लेखाशीर्ष उघडण्यात आले असून (२५१५२७८२) अर्थसंकल्पीय तरतूदीद्वारे निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सन २०२६-२७ या वर्षासाठी रुपये १००० कोटी नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात आला आहे. निधीच्या उपलब्धतेनूसार राज्यभरात पाणंद रस्ते तयार करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. यासोबतच रोजगार हमी योजना विभागामार्फत राबविण्यात येणारी मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद रस्ते योजनेंतर्गत पाणंद रस्त्यांची कामे समांतरपणे चालू राहणार आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गौण खनिजातून महसूल वाढ होण्यासाठी जिल्हानिहाय उद्दिष्ट निश्चित करण्यात आल्याबाबत

**(१५) ५८५१ (१४-१२-२०२५) श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाकडून यावर्षी गौण खनिजातून ५५१७ कोटी रुपयांचा महसूल गोळा करण्यासाठी जिल्हानिहाय उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आतापर्यंत किती कोटी रुपयांचा महसूल वसूल करण्यात आला आहे,

(३) असल्यास, अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूकीला आळा घालण्यासाठी तसेच महसूल उद्दीष्टपूर्तीसाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (०५-०६-२०२६) :** (१) होय हे खरे आहे.

(२) महसूल व वन विभागाने दिनांक १५/०९/२०२५ च्या शासन निर्णयान्वये चालू वर्षासाठी गौण खनिजाच्या स्वामित्वधन वसूली करीता ठरवून दिलेल्या रुपये ५५१७ कोटी उद्दिष्टापैकी माहे डिसेंबर,२०२५ अखेर रुपये २२५०.६७ कोटी एवढा महसूल प्राप्त झालेला आहे.

(३) गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीस आळा घालण्याच्या दृष्टीने क्षेत्रिय स्तरावर तहसिलदार व उपविभागीय अधिकारी स्तरावर भरारी पथक स्थापन करण्यात आले आहे. गौण खनिजाच्या उत्खनन स्थळाची, खाणपटटयाची दिनांक ०३/०५/२०२१ च्या शासना निर्णयानुसार वेळोवेळी ईटीएस मोजणी करण्यात येते. तसेच वाळू व इतर गौण खनिजाचे अवैध/ अनधिकृत उत्खनन,वापर,वाहतूक व तस्करी रोखण्यात येवून महसूलात वाढ होण्याच्या दृष्टीने फौजदारी कारवाई करण्याचे निर्देश दिनांक ११/०७/२०२५ रोजीच्या शासना परिपत्रकान्वये क्षेत्रिय यंत्रणास देण्यात आलेले आहेत.

परिवहन आयुक्त यांनी दिनांक १७/०९/२०२५ अन्वये राज्यात वाळू व इतर गौण खनिजाचे अनधिकृत उत्खनन, वापर व अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या परवान्यावर मोटार वाहन अधिनियम १९८८ च्या कलम ८५ मधील तरतुदीनुसार विभागीय करवाई करण्यासाठी राज्यातील सर्व प्रादेशिक परिवहन प्राधिकरणास निर्देश दिलले आहेत. त्याचप्रमाणे दिनांक ०८/०४/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारित वाळू निर्गती धोरण-२०२५ निर्गमित करण्यात आलेले आहे.त्यानुसार वाळूची निर्गती लिलावाने करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर महानगरपालिकेंतर्गत शालार्थ वेतन प्रणालीमधून वेतन घेणाऱ्या शिक्षक - शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी अदा करण्याबाबत

**(१६) ६८०० (२४-०३-२०२६) श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेंतर्गत कार्यरत शिक्षक - शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ५९ महिन्याची सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी मिळाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२६ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, थकबाकी अदा न करण्याची कारणे काय आहेत, शालार्थ वेतन प्रणालीमधून वेतन घेणाऱ्या शिक्षक - शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ५९ महिन्याच्या सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२२-०६-२०२६) :** (१) व (२) नागपूर महानगरपालिका कर्मचारी यांना वेतन व भत्ते बाबत अस्तित्वात असलेले नियम शालार्थ प्रणालीमधून वेतन घेणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना देखील लागू होतात.

त्यानुषंगाने राज्य शासनाच्या समकक्ष पदावर कार्यरत असलेल्या महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना देखील सहाव्या वेतन आयोगात वेतननिश्चिती करतांना समान वेतन मिळावे याकरीता महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना दिनांक ०१ जानेवारी, २००६ ते दिनांक ०१ डिसेंबर, २०१० या कालावधीत दरवर्षी एक याप्रमाणे एकूण पाच काल्पनिक वेतनवाढी देण्यात आल्या व सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे नवीन पेबँडमध्ये वेतननिश्चिती करण्यात आली. तथापि, हा लाभ दिल्यामुळे दिनांक ०१ जानेवारी, २००६ ते दिनांक ३० नोव्हेंबर, २०१० या कालावधीपर्यंत कोणतीही थकबाकी अनुज्ञेय राहणार नाही, ही अट लागू करण्यात आली. या अटीस कर्मचारी कृती समिती यांची सहमती आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाअंतर्गत प्रलंबित प्रकल्पांतर्गत समस्यांचे निराकरण करण्याबाबत

**(१७) ७२५३ (२४-०३-२०२६) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.विक्रांत पाटील, श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई झोपडपट्टी पुनर्वसनाच्या (एसआरए) प्रलंबित प्रकल्पांबाबतीत पात्र असूनही हक्काच्या पुनर्वसनाच्या घरापासून वंचित ठेवलेल्या झोपडीधारकांच्या तक्रारींची तात्काळ दखल घेऊन घराचा ताबा, ट्रान्झिट भाड्याची थकबाकी याव्यतिरिक्त परिशिष्ट -२ अंतर्गत पात्रतेची यादी, जमिनीची मालकी अशा अन्य समस्यांचे निराकरण करण्यासाठी स्वतंत्र सर्वसाधारण समिती स्थापन करण्याचे आदेश मा.मुंबई उच्च न्यायालयाने प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार समितीमध्ये बृहन्मुंबई महानगरपालिका व म्हाडाच्या प्रातिनिधीक अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर आदेशाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१७-०६-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार विविध समित्या गठीत करण्यात आल्या असून मा.न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी झोपु प्राधिकरणाच्या परिपत्रक क्र. २३०, २३१, २३२, २३३, २३४ व २३५ अन्वये मार्गदर्शक तत्वे व विनियम निश्चित केले असून या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

**(१८) ८५१५ (१८-०३-२०२६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे निवृत्ती वेतन, उपदान, अशंराशीकृत निवृत्ती वेतन तसेच इतर थकीत बाबींसह एकूण १६ प्रलंबित मागण्या अनेक वर्षांपासून प्रलंबित ठेवण्यात आल्यामुळे विद्यापीठ प्रशासनाकडून जाणीवपूर्वक वेळकाढू, दिशाभूल करणारी व कर्मचारीविरोधी भूमिका घेतली जात असून कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्या दीर्घकाळ प्रलंबित असल्यामुळे त्यांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत असल्याची बाब दिनांक ६ जानेवारी, २०२६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्या दीर्घकाळ प्रलंबित ठेवून त्यांच्यावर आर्थिक अन्याय होण्यास जबाबदार असलेल्या संबंधित विद्यापीठ अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच प्रलंबित मागण्या पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१०-०६-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मुंबई विद्यापीठातील १९८५ ते १९९५ या कालावधीत नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक बाबींची पुर्तता होत नसल्याने निवृत्तीवेतनाचे प्रस्ताव प्रलंबित आहेत.

(२) याबाबत मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १४/१०/२०२५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार पुढील कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील मराठी शाळांची स्थिती सुधारण्याबाबत

**(१९) १३१३५ (०६-०४-२०२२) श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मराठी शाळांची संख्या व मराठी विद्यार्थ्यांची पटसंख्या मागील दहा वर्षात निम्म्याहून कमी झाल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१०-२०११ मध्ये मराठी शाळांची संख्या ४१३ तर विद्यार्थी संख्या १,०२,२१४ इतकी असून सन २०२०-२०२१ मध्ये शाळांची संख्या २८० व विद्यार्थी संख्या फक्त ३६,११४ एवढी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मराठी शाळांना सहा-सहा महिने मुख्याध्यापक मिळत नसून सन २०१३ नंतर आवश्यकतेनुसार शिक्षक भरतीही झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार मुंबईतील मराठी शाळांची स्थिती सुधारण्याबाबत कोणती आवश्यक ती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०५-०६-२०२६) :** (१) अंशतः खरे आहे.

इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये पाल्यास प्रवेशित करण्याचा कल पालकांमध्ये वाढत असून मुंबई महानगरपालिकेच्या प्राथमिक तसेच, खाजगी प्राथमिक मराठी माध्यमाच्या शाळांची संख्या व विद्यार्थ्यी पटसंख्या मागील काही वर्षांपासून कमी होत आहे.

(२) अंशतः खरे आहे.

मुंबईत, सन २०२४-२५ मध्ये मराठी शाळांची संख्या २५४ इतकी होती. तर, सन २०२५-२६ मध्ये मराठी शाळांतील विद्यार्थी पटसंख्या ३४,९८० इतकी आहे.

(३) हे खरे नाही.

वेळोवेळी भरती प्रक्रिया करण्यात आली असून सन २०२४ मध्ये मुंबई महानगरपालिकेतंर्गत मराठी माध्यमाकरीता रिक्त असलेल्या २१६ पदांची जाहीरात पवित्र प्रणालीवर देण्यात आली होती. त्यानुसार, १८६ पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली आहे.

तसेच, सन २०२१-२२ मध्ये विद्यार्थी पटसंख्येनुसार मराठी माध्यमाच्या शाळांमधील रिक्त असलेली मुख्याध्यापकांची १४ पदे, दिनांक ०९/११/२०२२ रोजी पदोन्नतीने भरल्यात आलेली आहेत. तसेच, सन २०२३-२४ मध्ये विद्यार्थी पटसंख्येनुसार मुख्याध्यापकांची २८ रिक्त पदे, दिनांक २३/०७/२०२४ रोजी पदोन्नतीने भरण्यात आली आहेत.

(४) मुंबईतील मराठी माध्यमाच्या शाळांमधील विद्यार्थ्यांची गळती थांबविणे व मराठी माध्यमाच्या शाळांची स्थिती सुधारण्यासाठी विविध उपक्रमांच्या (उदा.सेमी इंग्रजी माध्यम सुरू करणे, मराठी भाषा पंढरवडा इत्यादी) माध्यमातून प्रयत्न केले जात आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची विविध प्रकारची प्रलंबित देयके अदा करणेबाबत

**(२०) २३०४४ (२२-०७-२०२४) श्री.किरण सरनाईक, श्री.विक्रम काळे, श्री.सत्यजीत तांबे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव. अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्ह्यांतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सन २०१९ पासून थकीत पुरवणी, वैद्यकीय बिले प्रलंबित असून सदर देयके

निकाली काढण्यासंदर्भात अनियमितता होत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची विविध प्रकारची देयके, वरिष्ठ व निवड श्रेणी थकबाकी, वैद्यकीय देयके, नियमित थकीत देयके इत्यादी सन २०१९-२० पासून प्रलंबित असून, जिल्ह्यातील विविध शिक्षण संघटनांनी नाशिक येथे वेतन पथकाची भेट घेतली असता त्यांना उत्तरे देण्यास टाळाटाळ करत असल्याचे दिनांक ६ मे,२०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विविध प्रकारची थकीत देयके शिबिरे आयोजित करून तात्काळ निकाली काढणेबाबत व या कर्मचाऱ्यांचे आर्थिक नुकसान रोखणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच शिक्षक संघटनांनी प्रलंबित देयकांसंबंधित उत्तर देण्यास टाळाटाळ करणाऱ्या वेतन पथकाचे अधीक्षक यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१२-०५-२०२६) :** (१) हे खरे नाही. शासन निर्णय दिनांक १५/०७/२०१७ व आयुक्त (शिक्षण), पुणे या कार्यालयाच्या दिनांक ०४/०८/२०२१ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने थकीत वेतन अनुदान अदा करण्याच्या प्रक्रियेमध्ये सुसूत्रता येणे करीता अधिनस्त कार्यालयांना मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत. सन २०२३-२४ व सन २०२४-२५ मध्ये अनुक्रमे ७०,२६० व ६७,८४६ इतक्या देयकांना संचालनालय स्तरावरून मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच सन २०२४-२५ पासून थकीत देयकांस ऑनलाईन पध्दतीने शालार्थ प्रणालीद्वारे मान्यता देण्यात येत आहे.
(२)प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.